# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ३०.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २९.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ५०,८६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ३ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करुन १९,६७०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४०१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८६,०२२/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी यांचा लहान भाऊ नामे जितेंद्र उर्फ पप्पू बारेलाल तांडेकर, वय ३६ वर्ष रा. छत्तीसगडी देवांगनचे घरी किरायाने, अमर नगर, हिंगणा रोड, नागपूर हा हमाली तथा वाहन चालक म्हणून काम करायचा. दिनांक २७.०६.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २८.०६.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत हिंगणा रोडवरील झोन चौक, ठाकरेजी टी शॉपचे काऊंटर मागे फिर्यादीचे भावास कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन लाकडी ठोकळा व विटेने डोक्यावर व कपाळावर मारुन जिवानिशी ठार केले होते. फिर्यादी दिनेश बारेलाल तांडेकर वय ४० वर्ष रा. ब्रिजेश मोर्य यांचे घरी किरायाने, राजीव नगर, एम.आय.डी.सी. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी परिसरातील कंपनीचे तथा इतर ठिकाणचे सीसीटिव्ही कॅमेरा फुटेजची पाहणी करुन तसेच, आजुबाजुला विचारपुस करुन गुप्त माहिती प्राप्त झाल्याने आरोपी सुमित रविंद्रकुमार शुक्ला वय ३२ वर्ष रा. शेखापुर, सराय भारत, ता. सोराव जि. प्रयागराज, उत्तरप्रदेश यास ताब्यात घेतले. आरोपीस वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने सांगितले की, तो आणि मृतक जितेंद्र उर्फ पप्पू असे दोघे घटनास्थळी असलेल्या वेगवेगळया शेडमध्ये झोपले असता, मृतक हा दारु पिवून जोरजोराने ओरडत होता. त्यास मनाई करुन समजावले असता, त्याने आई—बहिणीवरुन शिवीगाळ केली तसेच, तो पुन्हा पुन्हा ओरडत होता. याचा राग आल्याने लाकडी ठोकळा व विटेने त्याचे डोक्यावर मारुन जिवानिशी ठार केले. आरोपीने गुन्हा कबुल केल्याने त्यास अटक करुन, पुढील कार्यवाहीस्तव एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी नागपूर शहर, मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि. सचिन भोंडे, राजाभाऊ जाधव, सफौ. विनोद देशमुख, पोहवा. नितीन वासनिक, हेमंत लोणारे, मनोज टेकाम, प्रितम यादव, सुशांत सोळंके, सुनित गुजर, रितेश तुमडाम, शरद चांभारे, पोअं. स्वप्निल खोडके, कुणाल गेडाम, नितीन बोपुलकर, अजमत शेख व रविंद्र खेडकर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ व पो.ठा. गिट्टीखदान पोलीसांची संयुक्त कामगीरी :— जिवे ठार मारणारे ०३ आरोपी व ०४ विधीसंघर्षीत बालक ताब्यात.</u>**

दिनांक २९.०६.२०२६ चे १८.३० ते १९.०० वा. वे दरम्यान, फिर्यादी सलमान इशाक शेख वय ३५ वर्ष रा. नटराज सोसायटी, प्लॉट क्र. ७१, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर हे व त्यांचे मित्र नामे मयुर भोजराज जाधव वय ३४ वर्ष रा. नर्मदा कॉलनी, गिट्टीखदान, नागपूर, शशांक तायवाडे वय अंदाजे ३२ वर्ष रा. फ्रेन्डस् कॉलनी, नागपूर आणि असदखान शहनवाज खान वय २८ वर्ष रा. उत्थान नगर, नागपूर असे चौघेही पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत फुटाळा तलाव ते वायुसेना कडे जाणारे रोडवर एका भुट्टा विक्री करणारे ठेल्याजवळ भुट्टा खात असतांना, तेथे आरोपी क्र. १) योगेंद्र उर्फ लाला शिवांकात पांडे वय २० वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर हा आला. आरोपी फिर्यादी व त्यांचे मित्राकडे रागाने पाहत भुट्टेवाल्यासोबत हास्य—विनोद करीत होता. फिर्यादीचा मित्र मयुर जाधव याने आरोपीस म्हटले की 'क्या देख रहा है', त्यावर आरोपीने 'क्यो बे मुझे जानता नही क्या' असे म्हणून, मयुर जाधव व आरोपी यांचेमध्ये बाचाबाची व हातापाई झाली. नंतर आरोपीने त्याचे मित्रांना फोन करुन बोलाविले असता, तेथे दुचाकीने आरोपी क्र. २) गुप्ता ३) जंगली तसेस, इतर चार अल्पवयीन मुले आली. पैकी जंगली नावाचे आरोपीने आपले जवळील चाकू लाला नावाचे आरोपीला देऊन 'सबको ढेर कर दे', असे म्हणून आरोपी योगेंद्र उर्फ लाला ने फिर्यादीचा मित्र असदखान व मयुर जाधव यांचेवर चाकुने वार केल्याने ते दोघे जखमी होऊन खाली पडले व इतर आरोपींनी फिर्यादी व त्यांचा मित्र शशांक यांना हातबुक्कीने मारहाण करुन फिर्यादीवर चाकू फिरविला असता, तेथील चायनिज ठेलेवाल्या एका इसमाने आरोपीचा वार चुकवुन फिर्यादीस वाचविले. फिर्यादी व त्यांचा मित्र शशांक हे दोघे घटनास्थळावरुन जीव वाचवून पळून गेले. घटनास्थळी आलेल्या पोलीसांनी जखमी यांना

उपचाराकरीता दंदे हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचा मित्र असद खान यास तपासून मृत घोषित केले व मयुर जाधव याचेवर उपचार सुरु आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपींविरूध्द कलम १०३(१),१०९(१),१८९(२),१८९(४),१९१(२),१९१(३),१९० भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ व पोलीस ठाणे गिट्टीखदान चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात आरोपींचा शोध घेवुन, युनिट क्र. २ यांनी आरोपी क्र. १) जितेंद्र उर्फ जंगली शिवाकांत पांडे वय २५ वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर व २) दीपक उर्फ प्रिन्स मनोज गुप्ता वय १९ वर्ष रा. पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर तसेच, पोलीस ठाणे गिट्टीखदान पोलीसांनी आरोपी क्र. ३) योगेंद्र उर्फ लाला शिवांकात पांडे वय २० वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर आणि ०४ विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेतले आहे. आरोपींना वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी ४ विधीसंघर्षीत बालकांसह संगनमताने गुन्हा केल्याचे कबुल केले. ४ विधीसंघर्षीत बालकांना बालसुधारगृह येथे दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, श्रीमती विनीता साहू, (उत्तर प्रभाग), मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, श्रीमती अन्नपुर्णा सिंग, परि.क्र. २, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे, श्री. सुहास जगताप (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, मवपोनि. श्रीमती ललिता तोडासे, मपोनि. शुभांगी देशमुख, सपोनि बोरखेडे, चांभारे, मत्ते, पोउपनि. पठान, इंगळे, शेरकर, राठोड, राऊत मपोउपनि. सुप्रीया पुंडगे व त्यांचे पथकाने संयुक्तीकरित्या केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे एमआयडीसी :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०६.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी शामनारायण रमाकांत पांडे वय ५७ वर्ष रा. प्लॉट क्र. ९१, सरोजिनी ले आऊट, राजीव नगर, हिंगणा रोड, नागपूर हे आपली पत्नी सौ. पार्वती वय

५० वर्ष यांचेसह त्यांचे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच २१ एफएन ७२५ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत संगम रोडने गजभिये ट्रेडर्स समोरून जात असता, आरोपी ट्रक क्र. एमएच ४० बीजी ९८३६ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोपेडला धडक देवुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादी व त्यांची पत्नी मोपेडसह रोडवर खाली पडल्याने फिर्यादी हे किरकोळ व त्यांची पत्नी जखमी गंभीर जखमी झाल्या. जखमी पती–पत्नी यांचा उपचार जीवनधारा हॉस्पीटल येथे करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. पकंज सयाम ९४०५५४५४२७ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब),३२४(२) भा.न्या.सं., सहकलम १८४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमणा :–** दिनांक २७.०६.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत मिनी माता नगर, राजीव गांधी शाळेजवळ, गली क्र. ५ येथे राहणारे मनोज शांताराम काटेकर वय ४० वर्ष यांनी त्यांचे राहते घरी कोणतेतरी अज्ञात कारणावरुन कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यांचे प्रकृति खराब झाली. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दि. २९.०६.२६ चे ०८.३५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. सौरभ बुनगे ९०२२१८५९१८ ९८९०९५४४०८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे मानकापूर :–** विनोदकुमार श्रीरामजी मालविय वय ६७ वर्षे रा. अनुपम सोसायटी, महाराणा नगर, मानकापूर नागपूर हे दिनांक १२.०६.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट ४ इंच, केस–पांढरे, डोळे–काळे, अंगात–पिवळा शर्ट व काळा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.



विनोदकुमार

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**